बालदिन - आपल्या भविष्याचे किरण
>> पान 2

आजोबा डॉ. तानाजीराव सावंत यांच्या प्रचारासाठी नात सखीताई सावंत यांचा गावागावांत जनसंवाद
>> पान 3

भूम-परंडा मतदारसंघात हायटेक प्रचार यंत्रणेमुळे आली रंगत
>> पान 4

**सुविचार**

सत्तेपेक्षा सामर्थ्य महत्त्वाचे असते.


दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com arambhmarathi535@gmail.com DAILY ARAMBH MARATHI

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 1 ले ■ अंक 260 वा ■ गुरूवार, दि. 14 नोव्हेंबर 2024 ■ TITLE CODE-MAHMAR52255 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5


## धाराशिव येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक भरतीच्या मुलाखतीचा निकाल जाहीर

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिवच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ मधील सहयोगी प्राध्यापक (शल्यचिकित्साशास्त्र) या पदाच्या मुलाखती दिनांक ०६ नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आल्या होत्या. या पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांचा निकाल आता आयोगाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे.

# लाडकी बहिण मतदान फिरवणार, शेतकऱ्यांची भूमिका निर्णायक ठरणार

**■ लोकसभेपेक्षा वेगळी समीकरणे, प्रचारात राज्य आणि स्थानिक पातळीवरील मुद्दे ■ मराठा आरक्षणाचा मुद्दा निवडणुकीतून गायब**

आरंभ मराठी । धाराशिव



विधानसभेच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात दुहेरी लढत सुरू असून, बंडखोरी किंवा अपक्षांच्या उमेदवारीने प्रमुख उमेदवारांची अडचण दिसत नाही. मात्र, ६ महिन्यांपूर्वी झालेली लोकसभेची निवडणूक आणि विधानसभेची सुरू असलेली रणधुमाळी यामध्ये मूलभूत फरक स्थानिक मुद्यांचा आहे. लोकसभेला देशपातळीवरील मुद्दे, मराठा आरक्षणाचा प्रश्न परिणामकारक ठरला. मात्र यावेळी राज्य आणि स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर निवडणुकीच्या प्रचाराने जोर धरला आहे.

विधानसभेच्या या निवडणुकीत लाडकी बहिण योजना मोठा परिणाम करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तर शेत मालाला भाव नसल्याने शेतकरी दादा सत्ताधाऱ्यांना घाम फोडण्याची शक्यता आहे. सध्याच्या वातावरणात कुठेही जातीय मुद्दा चर्चेला येताना दिसत नाही आणि दोन्ही प्रमुख उमेदवारांकडून मराठा आरक्षणाबद्दलचा मुद्दा उपस्थितही केला जात नाही. मराठवाड्यातील काही जिल्ह्यात मराठा आंदोलकांकडून उमेदवारांना टार्गेट केले जात असल्याचे दिसत आहे. धाराशिव जिल्ह्यात मात्र स्थानिक उमेदवारांच्या कामाकडे आणि व्हिजनकडे लक्ष दिले जात आहे. >> पान २

### सगळेच सत्ताधारी, कोणाला दोष देणार ?

गेल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात राज्यातील राजकीय समीकरणे कमालीची बदलली आहेत. प्रमख चार पक्षाचे सहा पक्ष झाले असून, सगळ्याच पक्षांनी गेल्या पाच वर्षांत सत्ता भोगली आहे. सुरूवातीची दोन वर्षे कोरोनात गेली. त्यामुळे निष्क्रिय सरकार म्हणून महाविकास आघाडीवर टीका करणाऱ्या नेत्यांनी फूट पाडून महायुती सरकार स्थापन केले.या सरकारने लोकहिताच्या योजना आणल्या. मात्र, ज्या पध्दतीने राज्यात पक्षांतर आणि सत्तांतर घडले, घडवले गेले, त्याबद्दल मतदारांमध्ये नाराजीची भावना आहे.मतदारांनी कौल दिला होता वेगळा आणि गेल्या पाच वर्षात राज्यात घडले वेगळे, त्यामुळे कोणत्याही एका राजकीय पक्षाकडून मतदारांना आता आशा-अपेक्षा उरलेल्या नाहीत. मात्र, समोर अन्य कोणताही सक्षम पर्याय नसल्याने मतदारांना यापैकी एक पर्याय निवडावा लागणार आहे.

### जिल्ह्याला हवाय आश्वासक चेहरा

मराठवाड्यात सर्वात मागास असलेल्या धाराशिव जिल्ह्याला विकासाची अपेक्षा आहे.माजी मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांच्यानंतर जिल्ह्याला सक्षम राजकीय चेहरा मिळालेला नाही. राजकीय अस्थिरता, बदलत असलेली राजकीय समीकरणे आणि मंत्रीमंडळात जिल्ह्याला न मिळणारे स्थान, यामुळे व्यापक स्वरूपात विकासाचा पल्ला गाठता येणे अशक्य होत आहे.त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष कसा भरून निघणार, हा खरा प्रश्न आहे. बेरोजगारी, शेती, पाणी, वीज, रस्ते, तातडीच्या आरोग्य सेवा, मुला-मुलींसाठी उच्च शिक्षण, असे अनेक मूलभूत प्रश्न कायम आहेत.या सगळ्या प्रश्नांची सोडवणूक करणाऱ्या आश्वासक चेहऱ्याची जिल्ह्याला गरज आहे. ही पोकळी भरून काढण्याची क्षमता असलेला नेता जिल्ह्याला हवा आहे.जिल्हा अशा सर्वसमावेशक नेतृत्वाच्या शोधात आहे.

# विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी @ 182 बसची प्रशासनाकडून मागणी

## एसटी महामंडळाला मिळणार पाऊण कोटी रुपये

आरंभ मराठी । धाराशिव




धाराशिव जिल्ह्यात विधानसभेच्या चार जागांसाठी बुधवारी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यासाठी जिल्हाभरातील मतदान केंद्रांपर्यंत मतपेट्या पोहोचवणे व त्या परत घेऊन येण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एसटी महामंडळाकडे १८२ एसटी बसची मागणी केली आहे. या १८२ बसच्या भाड्यापोटी एसटी महामंडळाला जवळपास पाऊण कोटी रुपये मिळणार आहेत. दिनांक १९ आणि २० नोव्हेंबर रोजी ईव्हीएम मशीन मतदान केंद्रावर नेण्यासाठी आणि मतदान झाल्यानंतर त्या मशीन मतमोजणी केंद्रावर घेऊन जाण्यासाठी या बसची मागणी करण्यात आली आहे. विधानसभेचे दिनांक २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यात एकूण १ हजार ५२३ मतदान केंद्रे आहेत. या केंद्रावर मतदान साहित्यासह कर्मचाऱ्यांच्या जाण्या-येण्याची व्यवस्था करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एसटी महामंडळाकडे १८२ बसची मागणी केली आहे. या १८२ बसचे भाडे म्हणून प्रशासनाकडून एसटी महामंडळाला ७३ लाख ६ हजार ४०० रुपये भाडे द्यावे लागणार आहे. धाराशिव जिल्ह्यातील विविध आगारांतून एसटी महामंडळाकडून या बस निवडणूक कामासाठी देण्यात येणार आहेत. या बस १९ नोव्हेंबर रोजी सकाळी मतदानांचे साहित्य त्या त्या मतदान केंद्रावर पोहोचवणार आहेत व २० नोव्हेंबरला मतदान संपल्यानंतर मतपेट्या घेऊन परत येणार आहेत.

### दोन दिवस होणार प्रवाशांचे हाल

धाराशिव विभागात अगोदरच एसटी बसची कमतरता आहे. त्यातच बऱ्याच बस नादुरुस्त आहेत. यापैकी १८२ बस निवडणूक कामाकरिता देण्यात आल्याने विभागात प्रवाशांच्या सेवेसाठी खूप कमी बस शिल्लक राहतील या बसवरच फेऱ्या कराव्या लागणार आहेत. त्यामुळे धाराशिव वरून मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, पणजी या लांब पल्ल्यांच्या बस नियमित धावतील, परंतु त्यांचीही संख्या कमी होणार आहे. तर ग्रामीण भागातील बस मोठ्या प्रमाणात रद्द कराव्या लागणार असल्याने १९ व २० नोव्हेंबर रोजी प्रवाशांची एसटी बसने प्रवास करताना अडचण होणार आहे. असे असले तरी मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केल्यामुळे आणि त्या दिवशी प्रवासी जास्त बाहेर पडणार नाहीत असा अंदाज असल्यामुळे उपलब्ध एसटी बसवर प्रवाशांची सोय होईल असे एसटी प्रशासनाचे म्हणणे आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या बस मतदानाच्या कामासाठी गेल्यास खासगी प्रवासी वाहतुकीला महत्व येईल.ग्रामीण भागातून शहरात येण्यासाठी किंवा शहरातून गावी जाण्यासाठी प्रवाशांना खासगी वाहनांचा वापर करावा लागेल.

### मतदार संघनिहाय एसटी बसची मागणी


| | | |
|---|---|---|
| धाराशिव-कळंब | - | ४३ |
| तुळजापूर | - | ६४ |
| उमरगा-लोहारा | - | २८ |
| भूम-परंडा-वाशी | - | ४७ |
| एकूण बसची संख्या | - | १८२ |

### आगारांना मिळणारे भाडे



| | | |
|---|---|---|
| धाराशिव | - | १७ लाख २ हजार ८०० |
| तुळजापूर | - | २५ लाख ४३ हजार |
| उमरगा | - | ११ लाख ९१ हजार |
| भूम | - | १८ लाख ६९ हजार |

## भक्तीशक्तीची काटेबारस: शेकडो भाविकांनी घेतल्या काट्यात उड्या



राज्यातील एकमेव असलेली काटेबारस यात्रा परंपरेनुसार बुधवारी पुरंदर तालुक्याच्या गुळुंचे गावाच्या ज्योतिर्लिंग महादेव यात्रेत मोठ्या भक्तीभावाने पार पडली.या यात्रेत यंदा दोनशेहून अधिक भाविकांनी बाभळीच्या काट्यांच्या ढिगामध्ये उड्या घेतल्या. पाण्यात सुरुंग मारावा, अशा भाविकांनी काट्यांमध्ये उड्या मारल्या.भक्तीशक्तीचा हा थरार पाहण्यासाठी भाविकांची गर्दी झाली होती.

छायाचित्र: विजयकुमार हरिश्चंद्रे.

# मतदारसंघाच्या विकासासाठी आरोग्यदूत डॉ.राहुल घुले यांना निवडून द्या

## ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांचे आवाहन

आरंभ मराठी । भूम



राज्यातील सत्ता मिळवण्यासाठी आंतरवली सराटी येथील पाचवी नापास व्यक्तीला पुढे करून राज्यात दहशत, झुंडशाही निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. याला आम्ही लगाम घालण्याचा प्रयत्न उठावाच्या माध्यमातून केला आहे. फुले-शाहू-आंबेडकरांना मानणाऱ्या राज्यात बहुजन व मराठा खांद्याला खांदा लावून राहतात.मात्र या समाजाला वेगळे करण्याचे काम शरद पवार यांनी केले असून, आता त्यांचा डाव साध्य होऊ देऊ नका.या निवडणुकीत सर्वसामान्य कुटुंबातील आरोग्य दूत आणि मतदारसंघातील जनतेचे आरोग्य जपणारे समाजसेवक डॉ.राहूल घुले यांना निवडून द्या, असे आवाहन ओबीसी आरक्षण बचाव संघर्ष समितीचे नवनाथ वाघमारे यांनी केले.

भूम-परंडा-वाशी मतदारसंघातील रासपचे उमेदवार आरोग्य दूत डॉ.राहुल घुले यांच्या प्रचारार्थ भूम येथे घेण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते.वाघमारे म्हणाले, खोक्यासाठी पळून जाणारे आमदार म्बुलन्स घोटाळे करणारे असून,त्यांच्यावर गद्दारीचा शिक्का आहे.त्यांनी दुसऱ्यांना धमकी देण्यापेक्षा स्वतःच्या बुडाखालचा अंधार बघावा.माजी आमदार राहुल मोटे यांच्यावरही त्यांनी जहरी टीका केली.ते म्हणाले, भित्रा व भ्रष्ट आमदाराने पंधरा वर्षे मतदारसंघात राहून बँका, कारखाने, दूध संघ खाल्ले. आमचा लढा हा गरीब मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी व ओबीसी आरक्षण वाचण्यासाठीच असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उमेदवार डॉ.राहुल घुले यांच्यासह त्यांचे बंधू डॉ. अमोल घुले,वडील भीमराव घुले, रासपचे विष्णू गोरे, आश्रुबा कोळेकर, विकास पाटील, पंजाबराव चौरे, नानासाहेब मदने, शेतकरी नेते मुजिब पठाण, सचिन जाधवर यांच्यासह मतदारसंघातील नागरिक, रासपचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. तर सूत्रसंचालन रासपचे गजानन सोलंकर यांनी केले.

## राणा पाटील यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची नळदुर्ग येथे आज सभा

आरंभ मराठी । नळदुर्ग



तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ नळदुर्ग येथे आज (दि.१४) सकाळी १० वाजता नळदुर्ग येथील मरीआई मैदानावर रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची जाहीर सभा होणार आहे. सभेच्या तयारीसाठी मरीआई मैदानात व्यासपीठ उभारणी करण्यात आली आहे. तसेच येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर हेलिपॅड तयार करण्यात आले आहे. महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या या सभेस भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, ड मिलिंद पाटील, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, माजी आमदार सुजितसिंह ठाकुर, दत्तात्रय कुलकर्णी, तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, रामदास कोळगे यांच्यासह माहायुतीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या सभेसाठी जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहावे असे आवाहन नळदुर्ग शहर भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अवैध दारूविक्री विरोधात परंडा पोलिसांची धडक कारवाई

आरंभ मराठी । परंडा

परंडा पोलीस ठाणे अंतर्गत दारुबंदी कायद्यानुसार अवैध दारू विक्रेत्यां विरोधात धडक कारवाई करत अवैध दारू विक्रेत्यांना जरब बसवली. आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने परंडा पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस अधिक्षक संजय जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन, उपविभागीय पोलीस अधिकारी,भूम गौरीप्रसाद हिरेमठ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी विनोद इज्जपवार, सहा. पोलीस निरिक्षक शंकर सुर्वे, सहा. पोलीस निरिक्षक प्रविण सिरसाठ, पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब खरात व पोलीस हवालदार गजानन मुळे, विश्र्वनाथ शिंदे, नितीन गुंडाळे, जिज्ञासा पायाळे, विशाल खोसे यांच्यासह पोलीस ठाणे परंडा येथील पोलीस अंमलदार यांनी आदर्श आचारसंहिता काळात १५ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर पर्यंत महाराष्ट्र दारुबंदी कायदा अंतर्गत एकुण १८ गुन्हे दाखल करुन ३३२ देशी दारू बाटल्या, ३४० लीटर गावठी हातभट्टी दारू, १९५०लिटर गुळ मिश्रीत रसायन असे एकुण २ लाख १६ हजार ८१० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## मतदान जनजागृतीसाठी आज धाराशिव शहरात मानवी साखळी

आरंभ मराठी । धाराशिव

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ करिता येत्या बुधवारी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी आज (दि.१४) मतदान जनजागृतीचा एक भाग म्हणून सकाळी ९ वाजता धाराशिव येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मतदान जनजागृती कक्ष (स्वीप) यांच्या वतीने मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले आहे. या मानवी साखळीमध्ये धाराशिव शहरातील सर्व नागरिक, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, युवक- युवती व अधिकारी कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.असे आवाहन स्वीप कक्षाच्या सहाय्यक नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती सुधा साळुंके यांनी केले आहे.

# विकसित पर्यटनस्थळ म्हणून नळदुर्ग राज्याच्या नकाशावर येईल

आरंभ मराठी । धाराशिव

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांचा विश्वास,स्वतंत्र तालुका निर्मितीच्या दिशेनेही महत्वपूर्ण पाऊल**



ऐतिहासिक किल्ला,पहिली बसवसृष्टी, वसंतराव नाईक यांचे स्मारक आणि स्वतंत्र भारतातील पहिले अशोकचक्र विजेते शहिद बचित्तरसिंह यांचे भव्य स्मारक, अशा वेगवेगळ्या प्रकल्पातून येणाऱ्या काळात एक विकसित पर्यटनस्थळ म्हणून नळदुर्गचा लौकिक ठळकपणे राज्याच्या नकाशावर कोरला जाईल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

तुळजापूरचे महायुतीचे उमेदवादर तथा आमदार राणा पाटील म्हणाले, पर्यटन क्षेत्र म्हणून तुळजापूर आणि नळदुर्ग ही ऐतिहासिक शहरे विकसित करण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे आवश्यक होते.त्यासाठी आपण नियोजनबध्द प्रयत्न केले. राज्यातील पहिली भव्य बसवसृष्टी नळदुर्ग येथे साकारणार आहे. त्यासाठी सोलापूर-हैद्राबाद-राष्ट्रीय महामार्गालगत पाच एकर जागा उपलब्ध करून घेतली आहे. त्या ठिकाणी महात्मा बसवेश्वरांचा अश्वारूढ पुतळा, साऊंड ॲन्ड लाईट शो, तसेच प्रशस्त ध्यानकेंद्रासाठी पाच कोटींचा निधी मंजूर झाला आहे. हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा यासाठी त्यांचेही भव्य स्मारक उभारण्यात येत आहे. त्यासाठी अडीच कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. निजामाच्या जोखडातून आणि रझाकारांच्या अमानवी छळातून मराठवाड्याची मुक्तता करण्यासाठी मोठे

### नळदुर्गच्या विकासकामांसाडी १५० कोटींचा निधी



आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले, ऐतिहासिक नळुदर्गच्या पुढील ३० वर्षांची गरज लक्षात घेवून ४८ कोटींच्या पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू केले. तर शहरातील डीपी रस्ते, नाली व इतर विकासकामांसाठी १५० कोटींहून अधिकचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातील बहुतांश कामे प्रगतीपथावर आहेत. स्वतंत्र तालुका निर्मितीची ५० वर्षांपासूनच्या मागणीला आपण आकार दिला आहे. नळदुर्ग येथे अपर तहसील कार्यालय कार्यान्वित झाले आहे. त्यामुळे तालुका निर्मितीचा एक महत्वपूर्ण टप्पा पूर्ण झाला आहे. मुस्लिम समाजबांधवांसाठी २ कोटी रूपयांच्या निधीतून शादीखाना उभारणीचे काम सुरू आहे. तर राष्ट्रीय महामार्गालगत ट्रामाकेअर सेंटरला मंजुरी मिळाल्याने भीषण अपघातातील व्यक्तींना वेळेत उपचार मिळून जीवितहानी टळण्यास मदत होणार आहे. ५५ वर्षांपासून दुरूस्तीअभावी रखडलेल्या कुरनूर मध्यम प्रकल्पाच्या कामासाठी २९ कोटी रूपयांचा निधी उपलबध झाला आहे.

---

शौर्य गाजवून हौतात्म्य पत्करलेले हवालदार बचित्तरसिंह यांचेही स्मारक ७५ वर्षानंतर नळदुर्गच्या शौर्यभूमित उभारले जात आहे. त्या ठिकाणी ज्ञात-अज्ञात हजारो स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतिंनाही उजाळा मिळणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

## बालदिन

आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान–प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# बालदिन - आपल्या भविष्याचे किरण




लहान मुलं म्हणजे आपल्या समाजाचं भविष्य. त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यात सकाळच्या सूर्याची उब असते आणि त्यांच्या डोळ्यांमध्ये स्वप्नांचे आकाश दडलेलं असतं. अशाच आपल्या भावी पिढीसाठी दरवर्षी १४ नोव्हेंबर हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे आपल्या देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस. चाचा नेहरू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेहरूंचं मुलांवर खूप प्रेम होतं. मुलांसोबत गप्पा मारणं, खेळणं, त्यांच्याशी मैत्री करणं हे त्यांना खूप आवडायचं. म्हणूनच त्यांच्या जन्मदिवशी आपण बालदिन साजरा करतो. आपल्या गावाकडच्या शाळेत बालदिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मुलं सकाळीच नटून–थटून शाळेत येतात. रंगीबेरंगी कपडे घालून, केसांना फुलं माळून मुली तर अगदी परीसारख्या दिसतात. मुलांनी पांढरा शर्ट आणि निळा हाफ पॅन्ट घातलेला असतो. शाळेला रंगीत पताका, फुलं आणि तोरणं लावलेली असतात. सगळीकडे आनंदी वातावरण असतं. कार्यक्रमाची सुरुवात होते ती पंडित नेहरूंच्या छायाचित्राला हार घालून आणि दीप प्रज्वलन करून. मग मुलं आपापले कार्यक्रम सादर करतात. कोणी गाणी म्हणतं, कोणी नृत्य करतं, तर कोणी छोट्या नाटिका सादर करतं. गावातले वडीलधारी मंडळी मुलांना भेटवस्तू देतात. शिक्षक मुलांना गोड गोड गोष्टी सांगतात. पंडित नेहरूंच्या आयुष्यातल्या प्रेरणादायी प्रसंगांची माहिती देतात. बालदिनाचं महत्त्व फक्त साजरा करण्यापुरतं मर्यादित नाही. हा दिवस आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो. मुलं ही देशाची संपत्ती आहेत. त्यांच्यावर योग्य संस्कार करणं, त्यांना चांगलं शिक्षण देणं, त्यांच्या कलागुणांना वाव देणं हे आपलं कर्तव्य आहे. प्रत्येक मूल हे वेगळं असतं. त्याची स्वतःची अशी क्षमता असते, कल असतो. त्याला ओळखून त्या दिशेने त्याला वाटचाल करायला मदत करणं गरजेचं आहे. दुर्दैवाने आजही अनेक मुलं शिक्षणापासून वंचित आहेत. बालमजुरी, बालविवाह अशा समस्या अजूनही आपल्या समाजात आहेत. गरिबी, अज्ञान यांमुळे अनेक मुलांचं बालपण हिरावलं जातं. त्यांच्या चेहऱ्यावरचं हसू हरवतं. बालदिन साजरा करताना या गोष्टींचाही विचार करायला हवा. प्रत्येक मुलाला शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे. खेळण्याचा, बागडण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. बालपण हे आयुष्यातलं सर्वात सुंदर वय असतं. या वयात मुलांना भरपूर प्रेम, मायेची ऊब मिळाली पाहिजे. त्यांच्या मनात दडलेल्या कलागुणांना बहरायला हवं. त्यांच्या स्वप्नांना पंख फुटायला हवेत. कारण आजची मुलं हीच उद्याची जबाबदार नागरिक असणार आहेत. ते देशाचं भविष्य घडवणार आहेत. बालदिनी आपण मुलांना बक्षिसं देतो, त्यांच्यासाठी खेळ स्पर्धा आयोजित करतो, गोड गोड खाऊ वाटतो. पण त्याबरोबरच त्यांच्यात चांगले विचार रुजवायला हवेत. देशप्रेम, माणुसकी, सहानुभूती, मदतीची भावना अशा मूल्यांची शिकवण द्यायला हवी. निसर्गप्रेम, पर्यावरणाचं रक्षण, स्वच्छता या गोष्टींचं महत्त्व त्यांना पटवून द्यायला हवं. खेळ हा मुलांच्या विकासाचा महत्त्वाचा भाग आहे. मैदानी खेळांमधून शारीरिक विकास होतो, शिस्त लागते, सहकार्याची भावना वाढते. म्हणूनच शाळांमध्ये, गावांमध्ये मुलांसाठी खेळाची मैदानं असायला हवीत. संगणक, मोबाईलच्या युगात मुलं मैदानी खेळांपासून दूर जात आहेत. त्यामुळे त्यांचं आरोग्य धोक्यात येत आहे. यासाठी पालकांनी, शिक्षकांनी मुलांना खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवं . म्हणूनच बालदिनाचा संदेश समजून घेऊया. मुलांचं बालपण अधिक आनंदी करूया. त्यांच्या विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करूया. मुलांच्या चेहऱ्यावरचं हसू कायम राहू द्या. कारण त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यातच आपल्या देशाचं उज्वल भविष्य दडलेलं आहे.



**प्रविण जरीचंद माळवदे**
मो नं –८६०५५३११९९
धाराशिव

## मी मतदार

दारिद्र्याच्या गोधडीला,
गरिबीची ठिगळे लावत गेलो।
पुन्हा एकदा नवीन आशेने
प्रगत जीवनाची कास धरत गेलो ।।

आले पुन्हा एकदा
निवडणुकीचे वारे,
वाटले सुटतील आता
विकासाचे प्रश्र्न सारे ।
दिसले आश्र्वासनाचे सारे चेहरे,
मतांसाठी जोडले गेले ताई–माई
आक्काचे नाते सारे।।

भाषणाच्या भैरी झाल्या,
सभांच्या वाऱ्या झाल्या ।
पाच वर्षांच्या लोकशाहीसाठी
दोन दिवसाच्या पार्ट्या झाल्या ।।
मतांच्या विक्रीसाठी,
पिकवला गेला पैशांचा मळा
तुडविलेल्या स्वाभिमानांनीच
चिरला गेला लोकशाहीचा गळा ।

वीज येईल, पाणी येईल,
गावोगावी रस्ते जाईल ।
सगळीकडे विकासाची
पहाट होईल ।।
ऐकून पाहून बरं वाटलं,
आहे हा एक
लोकशाहीचा फरिश्ता ।
लोकशाहीचा दाता,
उठलो, जागे झालो
झालो जागृत मतदारदाता
सुज्ञ विचाराने मी
दाबले त्याच्यासमोरील
विकासाचे बटण आता ।।

मी मतदार
विचार केला मत केले,
वाटलं होईल विकासाची दिवाळी ।
पण भ्रष्टाचायच्या लालसेने
केली त्यांनी आपल्या
मतांची होळी ।।

वाटलं आता द्रारिद्र्याच्या
गोधडीला, गरिबीचीसुद्धा ठिगळं
मिळणार नाहीत ।
मी मतदार आता
मतसुद्धा देणार नाही ।।

पण एकदम जाग आली,
भविष्याची वाट पाहिली ।
मिटेल कधीतरी भ्रष्टाचाराचा शाप,
घडेल कधीतरी मी मतदाराच्या
पदरात विकासाचे माप ।।
म्हणून मी एक मतदार,
नाही सोडणार लोकशाहीची वाट ।
अमोल मत देऊन,
उजडवणार लोकशाहीची पहाट ।।



कवी, गीतकार – श्री. खडबडे प्रशांत अनंतराव.
महात्मा गांधी विद्यालय,
दहिवडी

# कामे न करता फक्त गोड बोलणाऱ्या आमदाराला त्यांची जागा दाखवून द्या

## अजित पिंगळे यांच्या प्रचारसभेत शिवाजी कापसे यांची कैलास पाटील यांच्यावर टीका

**आरंभ मराठी । ईटकूर**

आमदार कैलास पाटील यांच्या कार्यकाळात मतदार संघात कोणताही ठोस विकास झालेला नाही. नागरिकांच्या मुलभूत गरजा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता इत्यादी प्रश्र्न आजही तसेच आहेत. कैलास पाटील यांनी या समस्यांकडे दुर्लक्ष केले आहे. फक्त गोड बोलण्यात अग्रेसर असणाऱ्या विद्यमान आमदाराला येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंघातील जनतेने जागा दाखवून द्यावी असे आवाहन कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे यांनी केले. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारसभेत शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार अजित पिंगळे यांच्या प्राचारार्थ कळंब तालुक्यातील ईटकूर येथील सभेत कापसे बोलत होते.

याप्रसंगी महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांनी स्पष्टपणे सांगितले की, या आमदाराच्या निष्क्रियतेमुळे परिसरातील जनता त्रस्त आहे. नागरीकांच्या अपेक्षेप्रमाणे कूठल्याही भागाची विकासकामे झाली नसल्याचे ते म्हणाले. स्थानिक नागरिकांनी आता जागृत होऊन आपल्या हक्कांसाठी एक नंबर क्रमांकावरील धनुष्य बाण चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्ता विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा.सुशील शेळके, पंचायत समितीचे माजी उपसभापती लक्ष्मण आडसूळ यांनी अजित पिंगळे यांना उद्याच्या निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन केले. तसेच गंभीरवाडी, वाकडी (केज),



आंदोरा या गावातील बैठकीला मतदारांची मोठी गर्दी होती. यावेळी वाकडी (केज) या गावातील अनेक युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. गावातील बहुसंख्य मतदारांची, महायुती व घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# मतदानाचा टक्का वाढावा यासाठी आज धाराशिव शहरात रन फॉर व्होट रॅली

**आरंभ मराठी । धाराशिव**



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ करिता येत्या २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत जिल्ह्यातील सर्व चारही विधानसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. या निवडणुकीत जास्तीत जास्त संख्येने मतदान व्हावे, यासाठी मतदान जागृती कार्यक्रमांतर्गत आज (दि.१४) सकाळी ८ वाजता धाराशिव येथे रन फॉर व्होट रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीचा शुभारंभ सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून होणार आहे. या रॅलीमध्ये जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी सहभागी होणार आहेत. रन फॉर व्होट रॅलीला जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरुवात होणार आहे. ही रॅली मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, राजमाता जिजाऊ चौक, संत गाडगेबाबा चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गाने मार्गक्रमण करीत जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहोचून रॅलीचा समारोप होणार आहे.तरी या रॅलीमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाजपाच्या तालुका कार्यकारिणीत तेर परिसरातील कार्यकर्त्यांना स्थान

**आरंभ मराठी । तेर**








भारतीय जनता पक्षाची धाराशिव तालुका कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये तेर परिसरातील अनेकांना स्थान देण्यात आले आहे. धाराशिव तालुका महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी रामवाडी येथील व जिल्हा परिषद सदस्य राहिलेल्या उषाताई यरकळ यांची निवड करण्यात आली आहे. तालुका उपाध्यक्षपदी तेरचे माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी यांची निवड करण्यात आली आहे तर तालुका सरचिटणीस म्हणून तेर येथीलच भास्कर माळी यांना कार्यकारिणीत स्थान देण्यात आले आहे.

अल्पसंख्याक विभागाच्या धाराशिव तालुका संयोजक म्हणून तेरचे जुनेद मोमीन यांची निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे व्यापारी आघाडीच्या संयोजकपदी पानवाडी येथील विजय मुळे, अनु.जमातीच्या तालुका संयोजक पदावर कोळेवाडी येथील सुरजित राऊत यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने आ.राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, भाजपा जिल्हाध्यक्ष संतांजी चालुक्य यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी या निवडी जाहीर केल्या आहेत.

# तुळजापूर शहरात आज नरेन्द्राचार्य महाराज यांचे पादुका पूजन व प्रवचन सोहळ्याचे आयोजन



**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर शहरात आज (दि.१४) श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचा पादुका दर्शन व प्रवचन सोहळा सकाळी १० वाजता नगरपरिषद अग्निशामक केंद्र पार्किंग मैदानावर आयोजीत केला आहे. जिल्ह्यातील भाविक–भक्तांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सेवा समिती धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी तुळजापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शोभायात्रेची सुरुवात होणार आहे. प्रथम स्थानी कलशधारी महिला ,ध्वजधारी पुरुष, विविध पथके ,भजनी मंडळ , संबळ पथकासह सहभागी होणार आहेत. यावेळी पादुका पूजन व त्यानंतर सामाजिक उपक्रमा अंतर्गत जिल्ह्यातील ५८ गरजवंत शेतकऱ्यांना कृषी फवाऱ्यचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सभामंडपात एक हजार भक्त गुरुपूजनासाठी बसणार आहेत. तर उपासक दीक्षासाठी साधारणतः १५०० भक्तगण सपत्नीक दीक्षा घेण्यासाठी बसणार आहेत.

# बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानला मिळाली धमकी, मुंबई पोलिसांनी रायपूरच्या वकिलाला केली अटक

**आरंभ मराठी । मुंबई**

अभिनेता सलमान खाननंतर नुकतेच शाहरुख खानला जीवे मारण्याच्या धमक्या आल्या होत्या. यानंतर

## जीवन

लठ्ठ असू दे गोरी नसू दे
विषय खरे तर गुणाचा
आयुष्यातील बहुमोलाचा
लग्न विषय हा महत्त्वाचा

दिवसा मागून दिवस सरती
या आयुष्यातील बेरजेतुनी
क्षणा क्षणाला वय वाढते
दिसू लागला म्हातारा कुणी

आवडी निवडी सोडून दे तू
हट्ट नको देण्या घेण्याचा
भेटेल तिचा स्विकार कर तू
प्रश्न मिटेल तुझ्या खाण्याचा

विज्ञानाचा वापर करूनी
स्त्री–पुरुष हा समतोल ढळला
स्त्री जन्माची घटली संख्या
दुष्परिणाम तो आज कळला

जाती कुळाचे सोडून दे खूळ
जोड नाती तू माणुसकीची
विचारसरणी बदलून टाकावी
जीवनाकडे या पाहण्याची



**गोकुळ गायकवाड**
जामखेड: ९४२३१८३८२२

पान १ वरून...


# लाडकी बहिण मतदान फिरवणार

लोकसभेला उघडपणे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात लाट निर्माण झालेली होती.विधानसभेच्या या निवडणुकीत तशीच परिस्थिती होती, मात्र सरकारने चाणाक्षपणा दाखवत निवडणूक पुढे ढकलली. दरम्यानच्या काळात सरकारने अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. त्यात प्रामुख्याने लाडकी बहिण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज, मागील वीजबिल माफी, अशा निर्णयांमुळे सरकारविरोधात असलेल्या नकारात्मक मतांमध्ये काही प्रमाणात बदल दिसून येत आहे. लोकसभेप्रमाणे सरकारच्या विरोधातली भूमिका कमी झाली असली तरी महाविकास आघाडी देखील मतदारांना सक्षम पर्याय वाटत नाही. तिसऱ्या आघाडीचा फारसा प्रभाव नसल्याने मतदारांचा कल महायुती किंवा महाविकास आघाडीच्या बाजूनेच असणार आहे. सरकारने घेतलेल्या काही निर्णयावर विरोधकांनी सुरूवातीला टिकेची झोड उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यानंतर भूमिका बदलत महायुती सरकारपेक्षा आम्ही अधिक वाढ देऊन या योजनांचा विस्तार करू, असे सांगण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न दिसत आहे. लाडकी बहिण योजना सुरू केल्यानंतर महिला वर्गातून योजनेचे स्वागत झाले. तेंव्हा सुरूवातीला सत्ताधारी घर, जमिनी विकून घरचे पैसे देतात काय, या पैशातून महिलांची मते विकत घेता का, असे प्रश्र्न विचारणाऱ्या महाविकास आघाडीने पुन्हा मात्र आपल्याच जाहीरनाम्यात महिलांना ३ हजारांपर्यंत दरमहा मानधन देण्याचे मान्य केले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दाही महायुतीसोबत महाविकास आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात नमूद केला आहे. याशिवाय निवडणुकीत स्थानिक आमदारांनी केलेली कामे, सरकारच्या माध्यमातून आणलेला निधी, लोकसंपर्क, चारित्र्य आदी मुद्यांचा या निवडणुकीत समावेश दिसत आहे. लोकसभेप्रमाणे यावेळी जातीय, धार्मिक किंवा देश पातळीवरील मुद्यांवर या निवडणुकीचा प्रचार दिसत नाही.

# कोळी महासंघाच्यावतीने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना पाठींबा

**आरंभ मराठी । इटकळ**

तुळजापूर येथे कोळी महासंघ संघटनेने जाहीर पाठिंब्याचे लेखी पत्र महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांना देण्यात आले. समाजातील सर्व जाती–धर्मातील प्रत्येक नागरिकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भाजपा सदैव कटिबद्ध आहे,असे म्हटले आहे. यावेळी कोळी महासंघाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षा सौ.रेश्मामाताई भीमाशंकर घंटे, तुळजापूर तालुकाध्यक्ष रमेशअण्णा सर्जे, तालुका सचिव विठ्ठल महादेव घंटे यांच्यासह कोळी महासंघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




THIS LETTER PRINTED BY ADESH PRINTERS, RAMKRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED BY RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) ON BEHALF OF CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH AND PRINTED AT ADESH PRINTERS, RAM- KRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST.DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED AT RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) EDITOR SHRI. CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०

## विविध वृत्त...

### जेजुरी देवसंस्थान समितीला निर्मल वारी सेवा कार्याचा सन्मान



**आरंभ मराठी । जेजुरी**

पुणे येथे 'निर्मल वारी' आणि 'सेवा सहयोग प्रतिष्ठान' यांच्यावतीने आयोजित निर्मल वारी अभियानाच्या दशकपूर्ती सोहळानिमित्त अभियानातील विशेष सहभागाबद्दल श्री मार्तंड देव संस्थान व श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट,जेजुरी यांचा सन्मान श्रीराम जन्मभूमी तीर्थ अयोध्या न्यासाचे कोषाध्यक्ष प. पु. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी अभियानाचे प्रणेते आणि जगद्गुरू तुकाराम महाराजांचे दहावे वंशज ह. भ. प. शिवाजीमहाराज मोरे, माजी खासदार प्रदीप रावत, सेवा सहयोगचे श्री. नरेंद्र वैश्यांपायन, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, आळंदी देवस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त राजेंद्र उमाप, निरंजन, श्री. देहू देवस्थानचे प्रमुख विश्वस्त पुरुषोत्तम महाराज मोरे आदी मान्यवरांच्या उपस्थित सोहळा पार पडला. मार्तंड देवसंस्थान तर्फे विश्र्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर आणि ॲड. पांडुरंग थोरवे यांनी श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट यांचे वतीने मंगेश जेजुरीकर तसेच जेजुरी नगर परिषदेच्या वतीने दोडके आणि माजी नगरसेवक माधवशेठ सोनावणे यांनी सन्मान स्वीकारला.

### तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची इन्फोसिसमध्ये प्रशिक्षणासाठी निवड




**आरंभ मराठी । धाराशिव**

ईन्फोसिस या जगप्रसिद्ध आयटी टेलिकॉम कंपनीने खास करून अभियांत्रिकीच्या महिला विद्यार्थीनींसाठी प्रगती : पाथ टू फ्युचर या प्रशिक्षणाची सुरुवात केली. आर्टिफिशल इंटेलिजन्स, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल साक्षरता, व्यावसायिक कौशल्य विकास , लीडरशिप, उद्योगजगताशी मिळते जुळते ज्ञान आत्मसात कसे करायचे अशा कोर इंजिनीरिंग नॉलेज अशा विविध विषयावर प्रशिक्षण देण्यात येत आहे. १२ आठवडे चाललेले हे प्रशिक्षण ११ आठवडे ऑनलाईन पद्धतीने आणि १ आठवडा इन्फोसिस कंपनीच्या हिंजवडी येथील ऑफिस मध्ये ११ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर घेण्यात येणार आहे. दर आठवड्याला तज्ञ मार्गदर्शक यांनी महिला विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले तसेच इंडस्ट्री ओरिएंटेड टास्क देण्यात आले . विद्यार्थिनींनी यशस्वी पाने ते पूर्ण केले . तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय ,धाराशिव च्या ईलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम , कम्प्यूटर सायंस, आर्टिफिशिअल ईंटलिजंस या विभागातील १३ विद्यार्थिनिंची इन्फोसिस पुणे येथे निवड झाली आहे. यामध्ये ज्ञानदा कूलकर्णी, शरयू काळे, नमीरा रजवी, सायली वाघमोडे, साक्षी बदले, सपना पवार ऋतुजा वऱ्हाडे, श्वेता सूर्यवंशी, संध्याराणी गुरव,रुद्राणी उजनकर, आकांक्षा क्षिरसागर, प्रतीक्षा भांगे, विशाखा चांदणे यांची निवड झाली. महाविद्यालयाचे ईंन्फोसिस ईंटर्नशीप तसेच स्प्रिंगबोर्ड कोऑर्डिनटोर म्हणून प्रा. अनिरुद्ध आर.देशपांडे यांनी काम पाहीले. विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, व्यवस्थापकीय समन्वयक प्रा.जी.एन.भातलवंडे, विभागप्रमुख डॉ.पी.एस.कोल्हे, प्रा.सुजाता गायकवाड, प्रा.प्रदीप पवार यांनी अभिनंदन केले.

### आविष्कार स्पर्धेत तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाने पटकावली दोन रौप्य पदके; विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरावर प्रोजेक्ट सादरीकरणाची मिळणार संधी




**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाने आविष्कार स्पर्धेत चांगली कामगिरी करत दोन रौप्य पदके पटकावली. आविष्कार २०२४-२५ इंटर यूनिवर्सिटी झोनल लेवल प्रकल्प सादरीकरण स्पर्धा नुकत्याच श्रीगणेश रामचंद्र क. कॉलेज ऑफ फार्मसी, जिल्हा परभणी येथे पार पडल्या. तेरणा महाविद्यालयात मागील पाच वर्षापासून विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना वाव दिला जात असून, विद्यार्थ्यांनी परभणी येथे अविष्कार उपक्रमांतर्गत १२ नवीन प्रकल्प सादर केले. यामध्ये तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील उत्कर्ष म्हात्रे ( कॅटेगरी - ह्यूमैनिटीज, लैंग्वेज फाइन आर्ट ) व विश्र्वजीत गवळी (कॅटेगरी - इंजिनिअरिंग टेक्नोलॉजी ) यांनी द्वितीय क्रमांक मिळवला असून या विद्यार्थ्यांची पुढील युनिव्हर्सिटी लेवल सादरीकरणासाठी निवड झाली आहे. महाविद्यालयात करत असलेला रिसर्च आणि डेव्हलपमेंट विभाग या चार प्रोजेक्टसाठी महाविद्यालय सर्वतोपरी प्रयत्न करून त्या प्रोजेक्टचे रूपांतर स्टार्टअप मध्ये करण्याचा प्रयत्न करत असून गतवर्षी महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत आयोजित महाराष्ट्र इनोव्हेशन चॅलेंज मध्येही प्रत्येकी एक लाखाप्रमाणे बीज भांडवल मिळाले आहे. त्यामुळे नवीन कल्पक कल्पनांचे रूपांतर स्टार्टअप मध्ये होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे व स्वतःचे स्टार्टअप लवकर सुरू होईल असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी केले. अविष्कार २०२४-२५ चे समन्वयक डॉ. सुशीलकुमार होळंबे, सह समन्वयक प्रा.रवींद्र गुरव, प्रा.डी. बी. ठाकूर, प्रा.डी. बी. भक्ते, प्रा.बालाजी चव्हाण, प्रा.ए.के.पिंपळे, प्रा.व्ही. एस. बोंदर, प्रा.आर. बी. ननवरे या सर्वांनी विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्था व्यवस्थापन व महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# आजोबा डॉ. तानाजीराव सावंत यांच्या प्रचारासाठी नात सखीताई सावंत यांचा गावागावांत जनसंवाद

## सखीताई सावंत यांच्या प्रचारसभांना महिलांचा व तरुणींचा प्रतिसाद

**आरंभ मराठी । परंडा**

भूम-परांडा-वाशी विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांनी मतदारसंघात प्रचारात आघाडी घेतली असल्याचे दिसत आहे. झालेली विकासकामे व विकासाचा त्यांनी मांडलेला रोडमॅप ही त्यांच्यासाठी जमेची बाजू ठरत आहे. सावंत हे गावभेट दौरे, सभा, घोंगडी बैठका यातून जनतेशी संपर्क साधून आपली भूमिका समजावून सांगत आहेत. तसेच जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत आणि कार्यसिद्धी प्रतिष्ठाणचे संस्थापक, युवा नेते गिरीराज सावंत यांनीदेखील प्रचाराची धुरा आपल्या खंद्यावर घेऊन प्रचारात आघाडी घेतली आहे. त्यातच आजोबा तानाजीराव सावंत यांच्या प्रचारासाठी त्यांच्या नात सखीताई धनंजय सावंत यांनीही प्रचारात उतरत गावभेट दौरे, सभांचा धडाका लावला आहे. सद्या तरी त्या या निवडणुकीतील शिवसेनेच्या स्टार प्रचारक ठरल्या असून, त्यांच्या जनसंवाद दौर्याला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. मतदारसंघात झालेली विकासकामे, आणि विकासाचा अनुशेष कायमचा संपविण्यासाठी पुन्हा एकदा प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांना विजयी करण्याचे आवाहन त्या मतदारांना करत आहे. त्यांच्या प्रचारसभा व गावभेट दौर्यांना महिलांसह युवती मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत.

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, युवा नेते गिरीराज सावंत यांच्या गावभेट दौरे, घोंगडी बैठकांना जोरदार प्रतिसाद लाभत आहे.





लाडक्या बहिणीसाठी महायुती सरकार देत असलेली आर्थिक मदत, मतदारसंघातील सुटलेला पाण्याचा प्रश्र्न, महिलांच्या डोक्यावरील हंडे उतरविण्यात आलेले यश, मतदारसंघाचा झालेला विकास, आणि पुढील काळात करायची विकासकामे याबाबत सखीताई मतदारांत जनजागृती करून, आजोबा तानाजीराव सावंत यांच्यासाठी मते मागत आहेत. त्यांच्या या जनसंपर्क दौरे व सभांना लाडक्या बहिणींसह भावांचा देखील उदंड प्रतिसाद लाभत असल्याचे दिसून येत आहे. भूम तालुक्यातील डोकेवाडी, लांजेश्र्वर, आंदरूड गावात त्यांनी जनसंवाद दौरा केला. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अर्चनाताई दराडे, माजी तालुकाप्रमुख कै.गणेश शेंडगे यांची कन्या सहीताई शेंडगे, प्रणिती दराडे, डोकेवाडी येथे ग्रामपंचायत सदस्य सुरेश खैरे, दादासाहेब जालन, प्रशांत रोटे, गोरख साळुंखे, संभाजी थोरात, सरपंच सुषमा थोरात, ग्रामपंचायत सदस्य अजित पवार, भाऊसाहेब खैरे, महाराज रघुनाथ आहेर, प्रसाद पवार, उद्धव डोके, विकास महाराज जालन, रोहिनी रोटे, सुनिता गोरख यांच्यासह महायुती व मित्र पक्षातील गाव व परिसरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत 'रुपामाता'चे दिपावली स्नेहमिलन उत्साहात

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील पाडोळी(आ.) येथे दिनांक १२ ऑक्टोबर रोजी रूपामाता नॅचरल शुगरच्या प्रांगणात औसा विधानसभा व लातूर विधानसभा मतदारसंघातील रूपामाता मिल्क व रूपामाता नॅचरल शुगरच्या दूध व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उपस्थितीत दिपावली मिलन व स्नेहभोजन कार्यक्रम औसा विधानसभा मतदार संघाचे उमेदवार अभिमन्यू पवार व आयोजक रूपामाता उद्योग समूहाचे संस्थापक अँड. व्यंकटराव गुंड यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात संपन्न झाला. यावेळी अभिमन्यू पवार यांनी औसा मतदारसंघात रुपामाता उद्योगसमूहाचा विस्तार असून औसा मतदारसंघातील ११० गावात दूध उत्पादक शेतकरी व ऊस उत्पादक मोठ्या प्रमाणात असून आमच्या तालुक्यातील




शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात शेतकऱ्यांचा ऊस 'रुपामाता' गाळप करत असुन त्या बद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. अँड. गुंड यांनी रूपामाताचा विस्तार हा धाराशिव जिल्ह्यासह बीड व लातूर जिल्ह्यात असून या भागातील शेतकऱ्यांचा ऊस गाळप करण्यास मी कटिबद्ध असल्याचे सांगून, अभिमन्यू पवार औसा विधानसभा व लातूर ग्रामीणचे उमेदवार रमेश कराड यांना मतदारांनी पाठबळ देण्याचे आवाहन केले. व्यासपीठावर जि,प. चे माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड (गुरुजी) सूर्यकांत (गुरुजी) पिसाळ, एकंबी तांडाचे उपसरपंच बाळासाहेब जाधव, ह. भ. प. बालाजी महाराज सूर्यवंशी, बेलकुंडचे सरपंच विष्णू महाराज कोळी, रूपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक अँड. अजित गुंड, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापुरात भाजपमध्ये इनकमिंग वाढले

### लोहगावच्या सरपंचासह कार्यकर्त्यांचा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यात भारतीय जनता पार्टी मध्ये अन्य पक्षातून इनकमिंग मोठ्या प्रमाणात वाढले असून, त्याचा फायदा तुळजापुरचे महायुतीचे उमेदवार आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना होण्याची शक्यता आहे. लोहगाव ग्रामपंचायतचे सरपंच, सदस्य व तंटामुक्त गाव समितीच्या पदाधिकारी, सदस्यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपात प्रवेश केला आहे. अनेक वर्षांपासून असलेले काँग्रेस नेतृत्व त्यांनी आता अमान्य केले आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे नेतृत्व मान्य करीत लोहगावचे सरपंच प्रवीण बसवराज पाटील,



तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष विनायक काटकर, ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत माने, मारुती बनसोडे, सचिन काटकर, माळाप्पा बनसोडे, अविनाश मेंडके, वीरभद्र मेंडके, सोपान मारेकर, लक्ष्मण शेंडगे, पोपट शेंडगे, नवनाथ मेंडके, शिवानंद कलशेट्टी, संतोष जगताप, अतुल पाटील, अशोक बिराजदार, अक्षय पाटील, तात्या काटकर, संजय स्वामी, नागनाथ कोकरे, शंकर बनसोडे, नितीन स्वामी, अभिषेक बनसोडे, सूर्यकांत फडताळे, सातलिंग पाटील, अर्जून माशाळकर यांचा समावेश आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सर्वांची भूमिका महत्त्वाची ठरणार असून महायुतीच्या विजयासाठी सर्वांनी निर्धार केला आहे.

## मल्हार पाटलांच्या कॉर्नर सभांना जोरदार प्रतिसाद

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन



**आरंभ मराठी । धाराशिव**

तुळजापूर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारासाठी युवा नेते मल्हार पाटील यांनी धाराशिव तालुक्यातील आरणी, टाकळी (ढोकी), भंडारवाडी, दाऊतपूर येथे कॉर्नर बैठका घेतल्या. तसेच महायुतीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या भेटी घेऊन निवडणुकीसंदर्भात चर्चा केली.त्यांच्या सभांना जोरदार प्रतिसाद मिळत आहे.



युवा नेते मल्हार पाटील म्हणाले की, धाराशिव तालुक्यातील आरणी, टाकळी, भंडारवाडी, दाऊतपूर व परिसरातील विविध गावांतील बहुतांश नागरिक आपल्या हक्काची माणसे असून पहिल्यापासून माजी खासदार डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यावर जिवापाड प्रेम करणारी आहेत. या गावांनी दिलेली साथ पाटील कुटुंबीय कधीही विसरू शकत नाहीत. गेल्या पाच वर्षात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी गावांच्या विकासासाठी भरपूर निधी उपलब्ध करून दिला आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यातील महत्वाचे विषय मार्गी लावले आहेत. तसेच केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री रोजगार हमी कार्यक्रम व मुख्यमंत्री रोजगार हमी कार्यक्रम या योजनेच्या माध्यमातून अनेक तरुणांना व्यवसाय उभारणीसाठी मदत केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी आमदार पाटील यांच्या विकासाच्या मुद्यावर प्रभावित होऊन भंडारवाडी येथील काँग्रेसचे ऋषी माळी यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. याबद्दल त्यांचे स्वागत केले. तसेच राज्यात पुन्हा महायुती सरकार येणार आहे. आपली राजकीय ताकद वाढवण्यासाठी आपल्या हक्काच्या या गावांतून मोठे मताधिक्य अपेक्षित आहे. त्यामुळे प्रमुख कार्यकर्त्यांनी मतदारांपर्यंत जाऊन प्रत्येक मतदान आपल्या हक्काच्या आमदार पाटील यांना म्हणजेच कमळाला कसे होईल, यासाठी कष्ट घ्यावेत, असे आवाहन पाटील यांनी केले.

## प्रचार अंतिम टप्प्यात; सर्वच उमेदवारांचा कॉर्नर बैठकांवर भर

**आरंभ मराठी । आलुर**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आता सहा दिवस शिल्लक राहिले आहेत. नामांकन दाखल झाल्यापासून पक्षाचे उमेदवार प्रचाराच्या कार्यात गुंतले आहेत. सध्या मोठ्या नेत्याच्या सभा लावण्यापेक्षा विविध गावात, परिसरात कॉर्नर मिटिंग घेण्यावर भर दिला जात आहे. यासाठी त्या परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांना जबाबदारी देऊन अशा बैठकांचे नियोजन केले जात आहे. सकाळी सहा वाजल्यापासूनच उमेदवार मतदार संघातील अनेक गावांमध्ये नियोजन करताना दिसून येत आहेत. राजकीय उमेदवाराबरोबरच अपक्ष उमेदवार सर्वच भागात लाऊडस्पीकर द्वारे प्रचार करू लागले आहेत. दुसरीकडे काही उमेदवारांनी खासगी वाहने आरक्षित केली असून, पदाधिकारी व कार्यकर्ते आपापल्या मतदारसंघात प्रचार करू लागले आहेत. निवडणुकीत आपला माहोल तयार करण्यासाठी उमेदवारांकडून रात्री कार्यकर्त्यांसाठी हॉटेल, ढाब्यावर खास व्यवस्था करण्यात आली आहे. शहरालगतचे तसेच महामार्गावरील ढाबे सध्या हाउसफुल्ल झाले आहेत. एकीकडे वातावरणातील तापमान कमी होत असून, गुलाबी थंडीची चाहूल लागलेली असताना दुसरीकडे राजकीय वातावरण मात्र गरम होत असल्याचे चित्र दिसत आहे.

# आ. राणा पाटील यांच्यामध्ये मतदारसंघाच्या विकासाची धमक

## अर्चनाताई पाटील यांचा विश्वास, जनसंवाद दौऱ्यास प्रतिसाद

**आरंभ मराठी । धाराशिव**

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी तुळजापूर विधानसभा मतदारसंघात गेल्या पाच वर्षात अनेक विकासाची कामे मार्गी लावली असून, अनेक कामे प्रगतीपथावर आहेत.त्यांच्यामध्ये विकास कामे खेचून आणण्याची धमक असून, येणाऱ्या काळात आमदार राणा पाटील हेच मतदारसंघाचा विकास घडवून आणतील,त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन अर्चनाताई पाटील यांनी केले आहे.





तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या विजयासाठी अर्चनाताई पाटील यांनी महिलांच्या माध्यमातून मतदारसंघ पिंजून काढला आहे. तुळजापूर आणि धाराशिव तालुक्यातील लाडक्या बहिणींनी संकल्प केला आहे. जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील यांच्या जनसंवाद दौऱ्यास माता भगिनींसह सर्वसामान्य मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. तुळजापूर तालुक्यातील चिकुंद्रा, मानेवाडी, धाराशिव तालुक्यातील चिखली येथे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ अर्चनाताई पाटील यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. लाडक्या बहिणींसाठी भाजपा महायुती सरकार पुन्हा सत्तेत येणे आवश्यक आहे. गावागावांचा सर्वांगीण विकास आणि महिलांच्या सन्मानासाठी महायुती सरकार पुन्हा सत्तेवर आल्यानंतर लाडक्या बहिणींना महिन्याला २१०० म्हणजेच वर्षाला २५ हजार २०० रुपये मिळणार असल्याचे अर्चनाताई पाटील यांनी सांगितले. तुळजापूर विधानसभा मतदार संघासह संपूर्ण जिल्ह्याचा कायापालट करण्याची क्षमता असलेले अनेक महत्वपूर्ण प्रकल्प आणि योजना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पूर्णत्वाच्या दिशेने पुढे नेल्या आहेत. यातून जिल्ह्याचा शाश्वत आणि सर्वांगीण विकास घडून येणार आहे. विकासाचा हा ओघ कायम ठेवण्यासाठी येत्या २० तारखेला कमळ चिन्हावर बटन दाबून महायुतीला आपल्या गावातून मोठे मताधिक्य द्यावे, असे आवाहनही अर्चनाताई पाटील यांनी केले. यावेळी महायुतीतील घटक पक्षांचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# भूम-परंडा मतदारसंघात हायटेक प्रचार यंत्रणेमुळे आली रंगत

## प्रचाराच्या धामधुमीत नेते-कार्यकर्त्यांच्या अदलाबदलीची रणधुमाळी



दत्ता अहिरे । आरंभ मराठी

**भूम** : भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदार संघात प्रचाराची रंगत वाढत चालली असून मुंबई पुणे शहरांना लाजवील अशी प्रचार यंत्रणा परंडा मतदारसंघात दिसून येत आहे. महायुतीचे उमेदवार आरोग्य मंत्री तानाजी सावंत व महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे तसेच वंचित बहुजन आघाडीचे प्रवीण रण बागुल यांची प्रचारात आघाडी दिसून येत आहे.

प्रा. तानाजी सावंत हे धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री मंत्री असल्याने व त्यांचा कामाचा आगळा वेगळा ठसा असल्याने महाराष्ट्रात त्यांची ओळख आहे. त्यांचे पुणे येथील कनेक्शन असल्यामुळे त्यांनी हायटेक प्रचार यंत्रणा उभी केली आहे. विकास कामाच्या जोरावर ते मतदारापर्यंत जात असल्याचे दिसून येते. सावंत हे महायुती मधील सर्व घटक पक्षांना सोबत घेऊन प्रचार करत आहेत.

दुसरीकडे महाविकास आघाडीच्या वतीने माजी आमदार राहुल मोटे यांनी तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हावर पुन्हा विधानसभेच्या निवडणुकीत उडी घेतली आहे. राहुल मोटे यांचे देखील थेट पवार कुटुंबासोबत संबंध आहेत. तसेच त्यांना राजकीय वारसा असल्याने ते जनमानसात व मागील केलेल्या कामाचा पाढा वाचत मतदान करण्याची विनंती करत आहेत. परंडा मतदारसंघात महाविकास आघाडीत फूट पडण्याची चिन्हे होती. परंतु शिवसेनेचे नेते रणजीत पाटील यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने महाविकास आघाडीला एका प्रकारे ऊर्जा मिळाली असून, शिवसेना उबाठा राष्ट्रवादी शरद पवार गट एकत्रित प्रचार यंत्रणा राबवत आहेत. परंडा विधानसभा मतदारसंघात बहुजन वंचित आघाडीने भक्कम अशी कार्यकर्त्यांची फळी उभी करून प्रचारात महाविकास आघाडी व महायुतीच्या उमेदवाराच्या तोडीस तोड देत हाय फाय प्रचार सुरू केला आहे. शेकडो गाड्यांचा ताफा सोबत घेत वंचित आघाडीचे उमेदवार प्रवीण रणबागुल ताकदीनिशी उतरले आहेत. त्यांचा व्यवसाय देखील पुणे येथे असल्याने प्रचाराच्या गाड्या, प्रचार गीते नाविन्यपूर्ण दिसून येत आहेत. सर्वत्र भोंग्याच्या गाड्या, गळ्यातील दुपट्टे, वेगवेगळ्या रंगाचे झेंडे, जाहीरनामा आदींनी प्रचार सुरू झाला आहे. मतदानासाठी काही दिवस उरले असताना देखील नेते व कार्यकर्ते हे मात्र या पक्षातून त्या पक्षात रोज वेगवेगळे पक्षप्रवेश सुरू आहेत. जुन्या पक्षाला सोड चिट्टी देऊन नव्या पक्षात जाणाऱ्या येणाऱ्यांची संख्या दोन्ही आघाडीमध्ये दिसून येत आहे. परंडा विधानसभा मतदारसंघात तीन तालुक्याचा समावेश असून परंडा, भूम व वाशी अशी मतदानाची विभागणी होत असते. परंडा विधानसभेची निवडणूक सुरुवातीच्या काळात एकतर्फी होईल असे वाटत होते. परंतु महाविकास आघाडीच्या एकजुटीमुळे परंडा विधानसभेची निवडणूक ही अटीतटीची होणार असल्याचे चित्र दिसत आहे. प्रचारामध्ये सावंत यांच्या कडून मतदारसंघात पाणी ,औद्योगिक विकास , बेरोजगारी, शेतकरी यांच्या प्रश्नावर भर दिला जात असून मागील ३० वर्षाच्या कालखंडातला विकास आणि गेल्या पाच वर्षातला विकास याबाबत सतत प्रचारात तुलना केली जात आहे. तर महाविकास आघाडी कडून शरद पवार गटाचे उमेदवार राहुल मोटे हे देखील सीना कोळेगाव पाण्याचा प्रश्न समोर घेत प्रचार सभा गाजवत आहेत. परंडा मतदार संघामध्ये एकूण २१ उमेदवार रिंगणात असून एका अपक्ष उमेदवाराने राहुल मोटे यांना पाठिंबा दिला आहे. परंडा मतदारसंघात येणाऱ्या दोन दिवसात अनेक मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची चिन्हे दिसत आहेत. मतदान सहा दिवसांवर आले असल्यामुळे शेवटच्या दिवसात काही राजकीय घडामोडी घडतील.

## धीरज पाटील यांच्या मविआचा नळदुर्ग येथे होम टू होम प्रचार



आरंभ मराठी । नळदुर्ग

नळदुर्ग येथे तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. धीरज पाटील यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडीचे कार्यकते घरोघरी जाऊन मतदारांची भेटी घेत जाहीरनामाचे पत्रक वाटप करुन महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. धीरज पाटील यांच्या कार्याविषयी नळदुर्ग शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये घरोघरी जाऊन कार्यकर्ते माहिती देत आहेत. नळदुर्ग शहरातील वसंतनगर, दुर्गानगर, इंदिरानगर व्यासनगर, ठाकरेनगर व करपेनगर आदीसह इतर ठिकाणी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी पदयात्रा काढून होम टू होम जाऊन प्रचार करताना दिसत आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. धीरज पाटील यांचे बंधू कैलास पाटील, संदीप सुरवसे, प्रशांत पुदाले, जयवंत मुळे, आनंद पुदाले, धनराज गायकवाड, सुनील डुकरे, शिवराज धरणे, विनोद कांबळे, संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकूर, शाम कनकधर, ताजोद्दीन शेख, नेताजी महाबोले, दत्ता राठोड, लक्ष्मण चव्हाण यांच्यासह कार्यकर्ते प्रचारात सहभागी झाले आहेत.

## तेर येथे निवडणूक प्रचारार्थ महायुती व महाविकास आघाडीचा गृहभेटींवर भर





आरंभ मराठी । तेर

तुळजापूर विधानसभा मतदार संघाचा निवडणुकीतील प्रचार शिगेला पोहोचला असून धाराशिव तालुक्यातील तेर येथे महायुती व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सध्या गृहभेटीवर भर दिला आहे. दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेऊन आपल्याच उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. तुळजापूर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ तेर येथे उपसरपंच श्रीमंत फंड, माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी, जुनेद मोमीन, विलास रसाळ, भास्कर माळी, अप्पा काळे, बालाजी पांढरे, विठ्ठल लामतुरे , प्रवीण साळुंके, नवनाथ इंगळे, बाळकृष्ण बडवे, इर्शाद मुलांनी, किशोर काळे, नवनाथ पसारे, अजीत कदम, संजय लोमटे आदी प्रमुख पदाधिकारी घरोघरी जात मतदारांना युतीचे उमेदवार आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी केलेल्या कार्याची ओळख करून देणाऱ्या हस्तपत्रिकेचे वाटप करून महायुतीला मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. तर महाविकास आघाडीचे उमेदवार धिरज पाटील यांच्यासाठी आघाडीचे पदाधिकारी माजी सरपंच महादेव खटावकर, रतन नाईकवाडी , बापू नाईकवाडी, अविनाश आगाशे, अमोल थोडसरे, अविनाश इंगळे, हिज्जू काझी, अप्पासाहेब चौघुले, धनंजय आंधळे,लखन रसाळ,चंद्रकांत माळी , अन्सार मासुलदार अभिमन्यू रसाळ काका राऊत यांच्यासह आघाडीचे कार्यकर्ते मतदाराच्या घरोघरी जाऊन आघाडीचा वचननामा मतदारांना देऊन आघाडीला मतदान करण्यासाठी आवाहन करीत आहेत. प्रचारासाठी आता जेमतेम पाच दिवस शिल्लक असल्यामुळे गृह भेटींवरच भर दिल्याचे दिसून येत आहे.

## शिवछत्रपतींच्या पुतळ्यांच्या आडून महायुतीकडून भ्रष्टाचार





■ आमदार कैलास पाटील यांचा सनसनाटी आरोप ■ भ्रष्ट महायुतीला हद्दपार करण्याचे आवाहन

आरंभ मराठी । कळंब

धाराशिव - कळंब मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास पाटील यांनी कळंब तालुक्यातील वेगवेगळ्या गावांत सभा घेतल्या. यावेळी त्यांनी महायुती सरकारवर भ्रष्टाचार, विकासकामांतील स्थगिती, शेतकऱ्यांवरील अन्याय आणि केंद्राच्या धोरणांवर कठोर टीका केली. आ. पाटील यांनी महायुती सरकारवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या आडून भ्रष्टाचार केल्याचे गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, सात महिन्यात कोकणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला , याचे कारण भ्रष्टाचार आहे. मांजरा नदीवरील बॅरेजेस काम, येडशी-कळंब रोड यासारख्या महत्वाच्या विकासकामांना स्थगिती देण्यात आली. आम्ही महायुतीसोबत सामील न झाल्याने या कामांना स्थगिती देण्यात आली आहे.

पाटील यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना फक्त नावापुरत्या असल्याचे सांगत, पिक विमा योजनेवर टीका केली. ते म्हणाले की, पिक विमा योजना ही शेतकऱ्यांच्या हिताची नसून, ती केवळ कंपन्यांच्या नफ्यासाठी राबवली जात आहे. पंतप्रधानांनी ही योजना स्वत:च्या राज्यात का लागू केली नाही, याचा विचार शेतकऱ्यांनी केला पाहिजे. यावेळी आ. पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारने केलेल्या कर्जमाफीच्या वचनाची आठवण करून दिली. त्यांनी दावा केला की, महाविकास आघाडीच्या काळात कोणत्याही अटीशिवाय शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. सत्ताधाऱ्यांनी दहा वर्षांत कर्जमाफी केली नाही, आता निवडणुकीपूर्वी कर्जमाफीच्या घोषणा करून शेतकऱ्यांना फसवण्याचा प्रयत्न करत आहेत.

पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आणि मतदारांना धोका न देण्याचे वचन देताना सांगितले की, मोदी-शहांच्या राजकीय प्रयोगानंतर पक्ष फोडला, चिन्ह चोरले तरी मी आपल्या मतदारांचा विश्र्वास न तोडता एकनिष्ठ राहिलो. माझा वारसा जपण्यासाठी मी कधीच गद्दारी करणार नाही.आगामी निवडणुकीत मतदारांनी विचारपूर्वक मतदान करावे, असे आवाहन पाटील यांनी केले.

## मतदान अधिकारी म्हणून नेमलेले कर्मचारी पोस्टल मतदानापासून वंचित

### प्राथमिक शिक्षक संघाचे निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन

आरंभ मराठी । धाराशिव

निवडणूक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पोस्टल मतपत्रिका न पुरविण्यात आल्याने जनजागृती करणारे कर्मचारीच राष्ट्रीय कर्तव्यापासून वंचित राहण्याची भीती शिक्षक संघटनेने व्यक्त केली असून, संघटनेने याबाबत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याना याबाबत निवेदन देऊन कर्मचाऱ्यांची समस्या मांडली आहे.



प्राथमिक शिक्षक संघटनेने निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र विधानसभेची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया चालू आहे, त्या करिता जिल्हाभरातून हजारो शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांची मतदान अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. जे कर्मचारी मतदान अधिकारी म्हणून कर्तव्यावर कार्यरत असतात, त्यांनाही मतदानाचा अधिकार बजावता यावा म्हणून निवडणूक विभागाकडून त्यांना पोस्टल मतपत्रिका देण्यात येते, त्यासाठी प्रशिक्षणात संबंधित कर्मचाऱ्याकडून आवश्यक ती माहिती घेतली जाते व त्यांना पोस्टल बॅलेट देण्यात येतो पण जिल्हाभर शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना किरकोळ त्रुटी काढून त्यांना पोस्टल बॅलेट पेपर देण्यात आले नाहीत,अशी अनेक शिक्षकांनी व कर्मचाऱ्यांनी संघटनेकडे तक्रार केली आहे. राज्यात व जिल्ह्यात सर्व शिक्षक सर्वांनी मतदान करावे म्हणून जनजागृती करतात, पण महसूल विभागाच्या चुकीमुळे संबंधित शिक्षक व कर्मचारीच मदनापासून वंचित राहू शकतात. बऱ्याच वेळी महिला व काही शिक्षक, कर्मचारी यांना वेळेत या किचकट प्रक्रियेमुळे आवश्यक ती माहिती देता येत नाही व ते वंचित राहतात. तसेच सर्व मतदारांनी सर्वांनी मतदान करावे म्हणून प्रशासनाकडून व अनेक शाळेमधून ही जनजागृती करण्यात येते. जनजागृती करणारेच कर्मचारी मतदानापासून वंचित राहू शकतात.तेव्हा कर्तव्यावर असणारा एकही शिक्षक व कर्मचारी मतदानापासून वंचित राहू नये म्हणून स्वतंत्र कक्ष स्थापना करून सर्वांना मतदानाचा अधिकार द्यावा व त्यांना पोस्टल बॅलेट पेपर उपलब्ध करून द्यावे,अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर अखिल महाराष्ट्र शिक्षक संघाचे लालासाहेब मगर,बशीर तांबोळी,बाळासाहेब वाघमारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महायुती सरकारने विकासाची गंगोत्री आणली

### माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड यांचे मत, आमदार चौगुले यांना निवडून देण्याचे आवाहन





आरंभ मराठी । उमरगा

महायुती सरकारने आपल्या मतदारसंघात विकासाची अनेक कामे केली असून, अजूनही अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. महिलांसाठी लाडकी बहीण योजना आणून महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. आता महायुतीने पुढील महिन्यापासून महिलांना २१०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उमरगा व लोहारा तालुक्याला कोट्यवधी रुपयांचा निधी मिळाला आहे. यामध्ये शहरी भागातही मोठ्या प्रमाणात निधी आला आहे. महायुती सरकारने फक्त आणि फक्त विकास केला आहे. त्यामुळे ज्ञानराज चौगुले यांना मत म्हणजे विकासाला मत आहे, असे मत माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड यांनी केले.

प्रा.गायकवाड हे चौगुले यांच्या प्रचारसभेत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भागवत आलमले, राष्ट्रवादीचे किशोर साठे, माझी चेअरमन सुनील जाधव, ग्रामपंचायत सदस्य दीपक आळंगे, भाजपा तालुका उपाध्यक्ष दिलीप पवार, माजी तालुकाध्यक्ष अनिल दादा वाडकर, करजगावचे प्रसाद जाधव ,काटी चिंचोलीचे विनायक पाटील, प्रवीण बापू पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सुनील साळुंखे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राहुल पाटील, माजी सभापती दिलीप गौतम, प्रा शौकत पटेल, विलास व्हटकर, जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, भाजप नेते राहुल पाटील आदी उपस्थित होते. उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना महायुतीचे उमेदवार ज्ञानराज चौगुले यांच्या माकणी गावात प्रचार सभेत बोलत होते. दरम्यान, एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी मतदारांनी या निवडणुकीत मला मतदान द्यावे.लाडकी बहीण योजनेच्या यशामुळे महिलांचे मोठ्या प्रमाणावर पक्षाकडे आकर्षण वाढले आहे. या योजनेतून महाराष्ट्रातील महिलांना भविष्याची नवी दिशा मिळत आहे. धाकटे पंढरपूर म्हणून ओळख असलेली माकणी येथे तीर्थक्षेत्र विकासांतर्गत गार्डन बोटिंग करण्याचा प्रयत्न करणार आहे. निवडून आल्यानंतर मागणी मंदिराला सभागृह करणार असा आश्र्वासन दिले. यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी सांगितले. यावेळी भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष शुभम साठे, अजित जाधव, गोविंद ढोणे, राष्ट्रवादी युवा नेतृत्व ओमकार साठे, ग्रामपंचायत सदस्य वामन भोरे, ग्रामपंचायत सदस्य अनिकेत पत्रिके, ग्रामपंचायत सदस्य किशोर गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्य विनोद मुसांडे, विक्रम राजपूत, दिग्विजय साठे, हरी सगर, ईश्वर भोसले,निखिल बंडगर, रितेश साठे, सुमित पाटील, पियुष पाटील,अविनाश राठोड,गौतम जाधव, निलेश कुसळकर,युवराज धोत्रे, दत्ता लोभे, करण कांबळे,प्रभूलिंग बस्टे, अमोल लोभे आदींसह गावातील नागरिक व महायुतीचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.